आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१६ फेब्रुवारी २०२५ रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- नवी दिल्ली स्थानकावर काल रात्री चेंगराचेंगरी होऊन किमान १८ जणांचा मृत्यू/ दुर्घटनेच्या चौकशीसाठी रेल्वेची समिती स्थापन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं भारत टेक्स २०२५ मध्ये सहभागी होणार

- भारतीय भांडवली बाजारामधून परदेशी गुंतवणूकदारांनी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात २१ हजार २७२ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली

**आणि**

- वूमन्स प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या सामन्यात काल दिल्ली कॅपिटल्सच्या संघाचा मुंबई इंडियन्सवर २ गडी राखून विजय

**<><><><><>**

नवी दिल्ली स्थानकावर काल रात्री चेंगराचेंगरी होऊन किमान १८ जणांचा मृत्यू झाला.  प्रयागराजला जाणाऱ्या गाड्यांमध्ये चढण्यासाठी अचानक अलोट  गर्दी झाल्यामुळे ही दुर्घटना घडली. मृतांमधे  महिलांचा, आणि दहा वर्षांखालील दोन बालकांचा समावेश आहे. मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी  दहा लाख रुपयांची मदत जाहीर झाली आहे. नवी दिल्ली स्थानकावर  परिस्थिती आता नियंत्रणात असल्याची माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली. नवी दिल्ली स्थानकावरची गर्दी कमी करण्यासाठी दिल्लीहून प्रयागराजला जाण्यासाठी तात्काळ चार गाड्या सोडण्यात आल्याचंही त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशातून सांगितलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही अश्विनी वैष्णव तसंच दिल्लीच्या नायब राज्यपालांशी चर्चा केली. जखमींना तत्काळ आवश्यक ती मदत

पुरवण्याचे निर्देशही त्यांनी दिले. फलाट क्रमांक १४ आणि १५ वर उतरण्यासाठी असलेल्या पुलावरुन उतरताना काहीजण घसरले त्यामुळे गर्दीतली माणसं एकमेकांवर कोसळल्यामुळे चेंगराचेंगरी झाल्याचं उत्तर रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकाऱ्यांनी सांगितलं. या दुर्घटनेच्या चौकशीसाठी उत्तर रेल्वेचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक नरसिंह देव आणि मुख्य सुरक्षा आयुक्त पंकज गंगावार यांची समिती रेल्वेने नेमली आहे. या समितीने स्थानकावरचे सीसीटीव्ही फूटेज राखून ठेवायचे निर्देश दिले आहेत. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू , यांनी या घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. दुर्घटनेत मरण पावलेल्यांच्या प्रियजनांचं त्यांनी सांत्वन केलं असून जखमी झालेल्यांना लौकर बरं वाटावं अशी कामना केली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही दुर्घटनेबद्दल तीव्र शोकभावना प्रकट केली आहे.

<><><><><>

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर झालेल्या दुर्घटनेची बातमी दुःखद आणि वेदनादायक आहे, अशा शब्दात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत भारत मंडपम् इथं भारत टेक्स २०२५ मध्ये सहभागी होणार आहेत. भारत टेक्स हे आंतरराष्ट्रीय पातळीवरचं भव्य वस्त्रोद्योग प्रदर्शन असून ते उद्यापर्यंत सुरू राहणार आहे. यामध्ये कच्च्या मालापासून ते तयार उत्पादनांपर्यंत विविध उत्पादनं आणि यंत्रसामुग्रीचा समावेश आहे. प्रदर्शनाबरोबरच विविध चर्चासत्र आणि प्रशिक्षण कार्यक्रमही घेतले जात आहेत. नवोन्मेष उपक्रम आणि स्टार्ट अप दालन तसंच हॅकेथॉनवर आधारित स्टार्टअप पिच फेस्ट आणि निधी योजना असे कार्यक्रम, तसंच डिझाइन स्पर्धाही घेण्यात येत आहेत . ५००० हून अधिक प्रदर्शक, १२० हून अधिक देशांतील ६००० आंतरराष्ट्रीय खरेदीदार आणि इतर विविध अभ्यागत या प्रदर्शनात

सहभागी होण्याची अपेक्षा आहे. ITMF म्हणजे आंतरराष्ट्रीय वस्त्रोद्योग उत्पादक महासंघ, ICAC म्हणजे आंतरराष्ट्रीय कापूस सल्लागार समिती - यासह - जगभरातल्या २५ हून अधिक आघाडीच्या जागतिक वस्त्रोद्योग संस्था आणि संघटना यामध्ये सहभागी झाल्या आहेत.

**<><><><>**

दिल्ली पोलिस विभागाचा ७८वा स्थापना दिन म्हणजेच रायझिंग डे आज उत्साहात पार पडला. केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय या सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. दिल्ली पोलीस आयुक्त संजय अरोरा यांच्या उपस्थितीत पोलिसांनी राय यांना मानवंदना दिली. देशातील सर्वोत्तम पोलीसदलात दिल्ली पोलिसांचा समावेश होतो असं राय यांनी यावेळी सांगितलं. जी ट्वेंटी शिखर परिषद तसंच कोविड महामारीच्या काळात दिल्ली पोलिसांनी बजावलेल्या कामगिरीबद्दल त्यानी प्रशंसा केली. सायबरगुन्ह्यांचा उलगडा करण्यासाठी भारतीय सायबरगुन्हे समन्वय केंद्र -14सी स्थापनेच्या कामी दिल्ली पोलिसांनी घेतलेल्या पुढाकाराचा उल्लेखही राय यांनी यावेळी केला, किंग्जवे कॅम्प परेड मैदानावर दिल्ली पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला.

**<><><><>**

भारतीय भांडवली बाजारामधून परदेशी गुंतवणूकदारांनी फेब्रुवारीच्या पहिल्या पंधरवड्यात २१ हजार २७२ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेतली आहे. जानेवारीत एकंदर ७८ हजार २७ कोटी रुपयांची परदेशी गुंतवणूक झाली होती. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी इतर देशांमधून आयात मालावर अतिरिक्त शुल्क आकारण्याची घोषणा केल्यानंतर परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी सावध पवित्रा घेतला असावा, असं बाजार वर्तुळातल्या तज्ज्ञांचं मत आहे.

**<><><><>**

बडोद्यात सुरु असलेल्या वूमन्स प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या दुसऱ्या सामन्यात काल शेवटच्या चेंडूपर्यंत खेळलेल्या सामन्यात दिल्ली कॅपिटल्सच्या संघानं २ गडी राखत मुंबई इंडियन्सवर विजय मिळवला. दिल्ली कॅपिटल्सच्या संघानं नाणेफेक जिंकून मुंबई इंडियन्सना प्रथम  फलंदाजीसाठी पाचारण केलं. त्यानंतर मुंबई इंडियन्सनी १६४ धावा  केल्या, यात नॅट साइवर ब्रंट ने नाबाद ८० तर कर्णधार हरमनप्रीत कौरनं ४२ धावांचं योगदान दिलं. संघातल्या इतर खेळाडू मात्र दशकाचा आकडा गाठण्यातही असफल ठरल्या. दिल्ली कॅपिटल्सच्या ऍना सदरलँड हिने ३ गाडी बाद केले तर शिखा पांडे ने २ आणि  मिन्नु मनी, एलिस कॅप्सी यांनी प्रत्येकी १ गाडी बाद केले. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या दिल्ली कॅपिटल्सनं दमदार सुरवात केली. कर्णधार  मेग लॅनिंग आणि शफाली वर्मा या दोघीनी  पावरप्ले मध्येच आपल्या संघाची धावसंख्या ६० वर पोहचवली होती. संघानं आपली धावसंख्या कायम वाढवत ठेवली आणि शेवटच्या चेंडूवर अरुंधती रेड्डीनं विजयासाठी आवश्यक २ धावा काढत संघाला विजय मिळवून दिला.

<><><><><>

एफआयएच प्रो लीग मध्ये आज भारतीय पुरुष तसंच महिला संघाच्या लढती होणार आहेत.  कलिंग हॉकी मैदानावर आज संध्याकाळी भारतीय महिला हॉकी संघ इंग्लंडच्या संघाविरुद्ध मैदानात उतरेल  तर पुरुष संघाचा सामना स्पेनशी होईल. डीडी स्पोर्ट्सवरुन या सामन्याचं थेट प्रक्षेपण होणार आहे.

<><><><><>

दिल्ली खुल्या टेनिस स्पर्धेत मासामिची इमामुरा आणि रिओ नागुची या जपानी खेळाडूंनी दुहेरी प्रकारात विजेतेपद पटकावलं. तर पुरुष एकेरी प्रकारात किरीयन जॅकवेट या फ्रेंच टेनिसपटूने विट कोप्रव्हाचा ६-३, ६-१ असा सरळ सेटमध्ये पराभव करून अंतिम फेरीत प्रवेश केला.

<><><><><>

कोलकाता इथे सुरू असलेल्या इंडियन सुपर लीग फुटबॉल स्पर्धेत आज ईस्ट बंगाल संघाचा सामना मोहम्मदन स्पोर्टिंग या संघाशी होणार आहे. हा सामना संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल. या स्पर्धेच्या प्लेऑफ फेरीत स्थान मिळवण्यासाठी हे दोन्ही संघ आज लढत देणार आहेत.

<><><><><>

उत्तर प्रदेशात बाराबंकी इथं पूर्वांचल एक्सप्रेस वे वर आज पहाटे रस्ता अपघातात ४ जणांचा मृत्यू झाला तर ६ पेक्षा जास्त जखमी झाले. महाराष्ट्रातून अयोध्येकडे चाललेली टेंपो ट्रॅव्हलर गाडी चालकाचं नियंत्रण सुटल्यानं रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या बसवर आदळून हा अपघात झाल्याचं समजतं. प्रवाशांपैकी एकाचा जागीच मृत्यू झाला तर ३ जण उपचारादरम्यान मरण पावले. मृतांची ओळख पटवण्याचं काम सुरु आहे असं पोलिसांनी सांगितलं.

<><><><><>

मुंबईतल्या मस्जिद बंदर भागात आज सकाळी एका इमारतीला लागलेल्या आगीत २ महिलांचा मृत्यू झाला तर २ जण जखमी झाले. धुरामुळे गुदमरून जखमी झालेल्यांवर जे जे रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोलीस आणि अग्निशमन दलानं घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली आहे. पोलीस आगीच्या कारणांचा तपास करत आहेत.

<><><><><>

रायगड जिल्ह्यातल्या पनवेल तालुक्यामधल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यात पर्यटनासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांवर काल मधमाश्यांनी हल्ला केला. या घटनेत कोपरखैरणे इथल्या एका व्यक्तीचा मृत्यू झाला, तर माटुंग्याच्या व्ही जे टी आय महाविद्यालयाचे ७ विद्यार्थी जखमी झाले. जखमींवर पनवेलमधल्या उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

//<><><><><>//